20 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नावीन्यपूर्ण उद्योगात महिलांनी पदार्पण करावे

## डॉ. अपर्णा राव यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठात 'सूक्ष्म उद्योजकता संधी'वर परिसंवाद

सकाळ वृत्तसेवा

टेंबलाईवाडी, ता. १९ : जागतिकीकरणाच्या स्पर्धेत आज सामाजिक गरजांमध्ये बदल होऊन वाढ होत असताना या परिस्थितीत नावीन्यपूर्ण उद्योगांना यशस्वी होण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत. या संधीचा फायदा घेण्यासाठी शहरी व ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन नावीन्यपूर्ण उद्योग क्षेत्रात पदार्पण करावे, असे आवाहन आयआयटी मुंबई येथील डॉ. अपर्णा राव यांनी केले.




**टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठात झालेल्या परिसंवादात बोलताना डॉ. अपर्णा राव. शेजारी वैशाली महाडिक, प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. गजानन राशिनकर आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या (कै.) श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, मध्यवर्ती रोजगार कक्ष व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी 'सूक्ष्म उद्योजकता संधी' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन झाले. त्यावेळी डॉ. राव बोलत होत्या. वैशाली महाडिक प्रमुख उपस्थित होत्या. नागपूरच्या शेप फाउंडेशनचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. गजानन राशिनकर, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण उपस्थित होते. डॉ. राव म्हणाल्या, "शिवाजी विद्यापीठ महिलांचे सशक्तीकरण व सक्षमीकरण करण्यासाठी जे प्रयत्न करीत आहे ते कौतुकास्पद असून, ग्रामीण भागातील महिलांना सूक्ष्म उद्योगात अनेक संधी उपलब्ध आहेत. या संधी विद्यापीठाच्या माध्यमातून महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. कोणताही उद्योग सुरू करत असताना या उद्योगाच्या उभारणीपासून उत्पादन

मार्केटमध्ये उपलब्ध करून देण्यापर्यंतचा सूक्ष्म विचार करणे आवश्यक आहे. हा विचार महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून विद्यापीठाने विविध कार्यशाळा चर्चासत्रे व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे."

महिलांना विद्यार्थी दशेतच काही उद्योग सुरू करण्यासंदर्भातील कौशल्याचे प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. आज विविध संस्था कौशल्य प्रशिक्षण देताना आपण पाहतो; परंतु या विकसित कौशल्यापासून नवनवीन सूक्ष्म उद्योग उभे राहिले पाहिजेत, असेही डॉ. राव यांनी सांगितले.

20 NOV 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नावीन्यपूर्ण उद्योग उभारणीत महिलांनी उतरावे

## डॉ. अपर्णा राव : विद्यापीठात महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी विषयावर परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत सामाजिक गरजांमध्ये बदल होऊन वाढ होत आहे. त्यामुळे नावीन्यपूर्ण उद्योगांना यशस्वी होण्याच्या संधी उपलब्ध झाल्या. या संधीचा फायदा घेण्यासाठी शहरी व ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन नावीन्यपूर्ण उद्योग क्षेत्रात पदार्पण करावे, असे प्रतिपादन आयआयटी मुंबई येथील डॉ. अपर्णा राव यांनी केले.



**कोल्हापूर : परिसंवादामध्ये बोलताना डॉ.अपर्णा राव.**

शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, मध्यवर्ती रोजगार कक्ष व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. राव बोलत होत्या.

डॉ. राव म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाचे महिलांच्या सक्षमीकरणासाठीचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी सूक्ष्म उद्योगात अनेक संधी उपलब्ध आहेत. या संधी विद्यापीठाच्या माध्यमातून महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. कोणताही उद्योग सुरू करत असताना या उद्योगाच्या उभारणीपासून उत्पादन मार्केटमध्ये उपलब्ध करून देण्यापर्यंतचा सूक्ष्म विचार करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महिला बचत गटांचे प्रतिनिधी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. वैशाली महाडिक, शेप फाऊंडेशन नागपूरचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. याचे आयोजन प्रा. मिलिंद सावंत, डॉ. अश्विनी पाटील, किरण शिंदे, लता चौगुले, विद्या कांबळे, वैशाली मदाने, शोभा पाटील यांनी केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गजानन राशिनकर यांनी आभार मानले.